# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्याकलम ४२(६) अंतर्गत)

**अभिवेदन (Representation) क्रमांक १५१ / २०२२**

**खंडीत वीज पुरवठा वेळेत चालू न केल्यामुळे नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

श्रीमती शिलावती दिलीप तावडे .................................................................................. अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, रत्नागिरी (महावितरण) ....... .......................... .......... .... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- गिरीधर द. तावडे
जयंत परूषोत्तम बिवलकर, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- विनायक तिरमुरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता
ओंकार डांगे, उपकार्यकारी अभियंता, रत्नागिरी (ग्रामीण)

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १ नोव्हेंबर २०२२

आदेश पारित दिनांक :- १८ नोव्हेंबर २०२२

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ (मंच) यांच्या दिनांक ७ जुलै २०२२ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २२ सप्टेंबर २०२२ रोजी दाखल केले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

२.	मंचाने तक्रारदार यांचे गाऱ्हाणे (क्रमांक ४२/२०२२), दिनांक ७ जुलै २०२२ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केले.

३.	अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी श्रीमती शिलावती दिलीप तावडे हे मुक्काम पोष्ट निरूळ, रत्नागिरी येथे फेब्रुवारी २०१९ पासून महावितरणचे कृषी ग्राहक (क्रमांक २१०८६०००५५७८) आहेत. अपिलार्थी यांनी सदर वीज जोडणी त्यांच्या बागायती जमीनीमध्ये कलम लागवडीसाठी व फवारणीसाठी घेतली. तसेच जोड धंदा म्हणून पशूपालनही केले जाते.
- दिनांक २० ऑगष्ट २०२१ रोजी अपिलाथीचा वीज पुरवठा अचानक बंद झाला. त्याचे कारण शोधले असता अपिलार्थीच्या बागेजवळ असलेल्या नदीच्या पलीकडील जागेत लघु दाब विद्युत वाहिनी तुटून रस्त्यावर पडल्याने वीज पुरवठा खंडीत झाल्याचे समजले. त्यानंतर दिनांक २३ ऑगष्ट २०२१ रोजी महावितरण पावस कार्यालयात वीज पुरवठा बंद असल्याचा रितसर अर्ज दिला. त्यावर प्रतिवादीने कोणतीही कार्यवाही केली नाही, म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर २०२१ रोजी स्मरणपत्र दिले. त्यावरही सुध्दा कोणतीही कार्यवाही केली नाही म्हणून दिनांक १३ डिसेंबर २०२१ रोजी दुसरे स्मरणपत्र दिले. त्याची प्रत रत्नागिरी ग्रामीण १ यास दिली सदर पत्रामार्फत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०२१ (कृती मानके, विनियम २०२१) नुकसान भरपाईची मागणी केली त्यावरही कोणतीही कार्यवाही झाली नाही.
- दरम्यानच्या कालावधीत दिनांक ६ जानेवारी २०२२ रोजी अपिलार्थीची वीज जोडणी पर्ववत झाली. त्याबाबतचे आभार व्यक्त करणारे पत्र अपिलार्थीने प्रतिवादीस पाठविले. अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक २० ऑगष्ट २०२१ ते ६ जानेवारी २०२२ रोजी या कालावधीसाठी खंडीत होता. कृती मानके, विनियम २०२१ नुसार ग्रामीण भागात वीज परवठा पर्ववत करण्यासाठी २४ तासाचा कालावधी ग्राह्य असल्याने दिनांक २३ ऑगष्ट २०२१ पासून १३५ दिवसाचा विलंब झाला. सदर कालावधीत पशूपालन व कलमांवरील औषध फवारणीसाठी अपिलार्थीस जनरेटरचा उपयोग करावा लागला, त्यासाठी खर्च

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

झाला. नुकसान भरपाई बाबत कोणत्याही स्तरावर कार्यवाही झाली नाही, म्हणून दिनांक २१ एप्रिल २०२२ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने अपिलार्थीचे गाऱ्हाणे दिनांक ७ जुलै २०२२ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केले.

- ऑगष्ट २०२१ महिन्यामध्ये रत्नागिरी विभागात कोणत्याही प्रकारचे वादळ झाले नव्हते. त्याबाबतचा हवामान खात्याचा कोणताही अहवाल प्रतिवादीने मंचासमोर ठेवलेला नाही. वादळ झाले व वीज पुरवठा पूर्ववत करण्यास विलंब झाला या सबबी देऊन प्रतिवादी हे कृती मानकाच्या सबबीपासून दूर जाऊ शकत नाहीत. प्रतिवादींनी त्यांच्या कामात कुचराई केली व त्यामुळे अपिलार्थीस १३५ दिवस वीजेपासून वंचीत राहावे लागले. म्हणून अपिलार्थी हे कृती मानकानुसार नुकसान भरपाईस पात्र आहेत.
- मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही. म्हणून दिनांक २२ सप्टेंबर २०२२ रोजी विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्याकडे अभिवेदन दाखल केले व त्या पत्राद्वारे खालील मागण्या केल्या.
  - ✓ मंचाचा आदेश रद्द करण्यात यावा.
  - ✓ अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक २० ऑगष्ट २०२१ ते ६ जानेवारी २०२२ रोजी या कालावधीसाठी खंडीत होता त्यासाठी कृती मानके, विनियम २०२१ च्या परिशिष्ट २ मुद्दा २(ii) मध्ये निश्चित केलेल्या दराने भरपाई मंजूर करावी.
  - ✓ सदर प्रकरणी विनाविलंब कार्यवाही न केल्याने जबाबदार कर्मचारी वर्गास समज देण्यात यावी.
  - ✓ मंजूर भरपाई वीज देयकापोटी जमा न करता एनइएफटीद्वारे अपिलार्थीच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी आदेश व्हावा.

४. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी हे मुक्काम पोष्ट निरूळ, रत्नागिरी हे फेब्रुवारी २०१९ पासून महावितरणचे कृषी ग्राहक (क्रमांक २१०८६०००५५७८) आहेत. अपिलार्थी यांनी सदर वीज जोडणी त्यांच्या कृषो वापरासाठी घेतली.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

- अपिलार्थी यांची वीज जोडणी असलेले गाव हे समुद्रकिनारी असल्याने ऑगष्ट २०२१ या कालावधीत झालेल्या पाऊस व वादळीवाऱ्याने तारा तुटून अपिलार्थीचा वीज पुरवठा खंडीत झाला. अपिलार्थीने वीज पुरवठा खंडीत झाल्याचा अर्ज दिनांक २३ ऑगष्ट २०२१ रोजी महावितरण पावस उपविभाग कार्यालयात दिला. त्या भागातील वीज वाहिनी ही सदर ठिकाणच्या आंबा बागेतून जात होती. तक्रारदार ग्राहकांच्या उपस्थित असणाऱ्या प्रतिनिधींना झाडे तोडण्यासाठी सहकार्य करावे अशी विनंती करण्यात आली परंतू त्यांनी सहकार्य केल नाही.
- अपिलार्थी ह्या भागाचे मोठे व प्रतिष्ठीत बागायतदार आहेत. अपिलार्थीचा वीज पुरवठा लवकरात लवकर चालू करण्यासाठी गरज म्हणून अपिलार्थीकडे झाडाच्या फांदया तोडण्यासाठी व लाईन ओढण्यासाठी प्रतिवादीच्या टिमबरोबर सहकार्य म्हणून मनुष्यबळाची मागणी केली. तथापि अपिलार्थीने त्याबाबत सहकार्य केले नाही. त्यामुळे वीज पुरवठा चालू करण्यात थोडा विलंब झाला. अपिलार्थी हे मीटर केबीन लॉक करून निघून गेले. त्यांना वारंवार विनंती करूनही मीटर केबीन उघडुन दिली नाही.
- दिनांक १७ मे २०२१ रोजी रत्नागिरीतील पावस भागाला तौकी (Taukae) वादळाच्या पावसाने झोडपून काढले. वादळवाऱ्यामुळे वीजेचे खांब उन्मळून पडले. मोठया प्रमाणात वीज वाहिण्या तुटल्या. सगळीकडे पाणीच पाणी होऊन पुरस्थिती निर्माण झाली होती, व जवळ जवळ सर्व पावस भाग वीज पुरवठापासून वंचीत होता. वीज पुरवठा नियमित करण्यासाठी इतर ठिकाणच्या काम करणाऱ्या एजन्सीस बोलावून त्यांच्याकडून काम करून घेऊन टप्प्या टप्प्याने वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला. काही भागातील वीज पुरवठा तात्पुरत्या प्रमाणात चालू करून देण्यात आला. त्यानंतर जुलै / ऑगष्ट २०२१ या कालावधीत पुन्हा एकदा त्या भागात पावसाने झोडपून काढले. या पावसामुळे अपिलार्थीकडे जाणारी लघुदाब वीज वाहिनी सोसाटयाच्या वाऱ्याने झाडाच्या फांदया लाईनवर आपटून, वीज पुरवठा खंडीत झाला.
- या सर्व संकटावर मात करून अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक ३० ऑगष्ट २०२१ रोजी पुर्ववत करण्यात आला.
- वीज पुरवठा पर्ववत झाल्याची शहानिशा करण्यासाठी प्रतिवादीचे कर्मचारी गेले असता सदरच्या ठिकाणावरील ग्राहकाचे मीटर हे कुलूपबंद पेटीत असल्याचे निदर्शनास आले, त्यावेळी ग्राहक किंवा त्यांचे प्रतिनिधी सदर जागेवर उपस्थित नव्हत. त्यामुळे वीज पुरवठा पर्ववत झाल्याची शहानिशा

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

करण्यास उशीर झाला. त्यामुळे त्या परीणामाची सूचना मीटर पेटीवर चिटकविण्यात आली. मीटर बाहेर घेण्याबाबतच्या तोंडी सूचना अपिलार्थीस करण्यात आल्या होत्या.

- सदर ठिकाणी वीज पुरवठा हा केवळ वीज वाहिनीवरती झाडांच्या वाढलेल्या फाद्यांमुळे व तेथील झाडे तोडण्यास परवानगी न मिळाल्याने वीज पुरवठा वेळोवेळी खंडीत होत होता. सदर ठिकाणी आंबा बागेतील वीज वाहिनीसाठी एरीयल बँच (एबी) केबल टाकून सदर समस्याचे कायमस्वरूपी निवारण करण्यात आले असून आजतागायत वीज पुरवठा अखंडीत चालू आहे. ३० ऑगष्ट २०२१ ते ६ जानेवारी २०२२ रोजी या कालावधीत मीटरवर वीजेचा वापर झाल्याचे प्रतिवादीने निदर्शनास आणून दिले. अपिलार्थीनी नुकसान भरपाईची मागणी अयोग्य असून ती फेटाळण्यात यावी.

## विश्लेषण व निर्णय

५. सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी व प्रतिवादींनी अभिवेदनात नमुद केलेले मुद्दे सुनावणी दरम्यान पुनश्चः उपस्थित केले.

६. अपिलार्थीनी नमुद केले की, दिनांक २० ऑगष्ट २०२१ रोजी अचानक वीज पुरवठा खंडीत झाल्यानंतर दिनांक २३ ऑगष्ट २०२१ रोजी महावितरण पावस कार्यालयात वीज पुरवठा बंद झाल्याचा रितसर अर्ज दिला. दिनांक १३ ऑक्टोबर २०२१ व दिनांक १३ डिसेंबर २०२१ रोजी वीज पुरवठा चालू करण्याबाबतची स्मरणपत्रे दिली. तरोही वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक २० ऑगष्ट २०२१ ते ६ जानेवारी २०२२ रोजी या कालावधीसाठी खंडीत होता. अपिलार्थींची वीज जोडणी दिनांक ६ जानेवारी २०२२ रोजी पुर्ववत करण्यात आलो. कृती मानके, विनियम २०२१ नुसार ग्रामीण भागात वीज पुरवठा पुर्ववत करण्यासाठी २४ तासाचा कालावधी ग्राह्य असल्याने दिनांक २३ ऑगष्ट २०२१ पासून १३५ दिवसाचा विलंब झाला. सदर कालावधीत पशूपालन व कलमांवरील औषध फवारणीसाठी अपिलार्थीस जनरेटरचा उपयोग करावा लागला, त्यासाठी खर्च झाला. म्हणून कृती मानके, विनियम २०२१ नुसार वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी झालेला विलंबासाठीची नुकसान भरपाई मिळण्याची मागणी सुनावणी दरम्यान केली.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

७.	प्रतिवादीनो सुनावणी दरम्यान नमुद केले की, अपिलार्थीच्या वीज पुरवठा खंडीत झाल्याचा अर्ज दिनांक २३ ऑगष्ट २०२१ रोजी महावितरण पावस उपविभाग कार्यालयात दिला. त्या भागातील वीज वाहिनी ही सदर ठिकाणच्या आंबा बागेतून जात होती. तक्रारदार ग्राहकांच्या उपस्थित असणाऱ्या प्रतिनिधींना झाडे तोडण्यासाठी सहकार्य करावे, अशी विनंती करण्यात आली, परंतू, त्यांनी सहकार्य केले नाही. तरीही अपिलार्थीचा वीज पुरवठा दिनांक ३० ऑगष्ट २०२१ रोजी पर्ववत करण्यात आला. परंतू ग्राहकाचे मीटर हे कुलूपबंद पेटीत असल्याने वीज पुरवठा पुर्ववत झाल्याची शहानिशा करण्यास उशीर झाला असला तरी वीज पुरवठा चालू होता. सदर ठिकाणी आंबा बागेतील वीज वाहिनीसाठी एरीयल बँच (एबी) केबल टाकून सदर समस्याचे कायमस्वरूपी निराकरण करण्यात आले व आजतागायत वीज पुरवठा अखंडीत चालू आहे. प्रतिवादीकडून अपिलार्थीचा खंडीत वीज पुरवठा पर्ववत करण्यास सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले. परंतू आंबाच्या झाडे किंवा त्यांच्या फांदया तोडण्यास झालल्या विरोधामुळे विलंब झाला. त्यामुळे कृती मानके, विनियम २०२१ नुसार विलंबासाठीची नुकसान भरपाई मिळण्याची केलेली मागणी अयोग्य असून ती फेटाळण्यात यावी अशी प्रतिवादींनी विनंती केली.

८.	दिनांक १७ मे २०२१ रोजी कोकणात झालेल्या तौकी (Taukae) या वादळाने वीजेचे खांब पडले, वायर कंडक्टर तुटणे, वायर तुटणे, झाडे पडणे इत्यादी घटना घडल्याने मोठया प्रमाणात नुकसान झाले. प्रतिवादींनी मुंबई पुणे या भागातून मनुष्यबळ, सामुग्री आणून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न केले. जुलै / ऑगष्ट २०२१ या कालावधीत पावस व आजुबाजूच्या भागात पुन्हा मोठया प्रमाणात वारा पाऊस झालयामुळे वीज वितरण प्रणालीत मोठया समस्या निर्माण होऊन पून्हा प्रतिवादींचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. वीज पुरवठाचे काम वेळेत पुर्ण करण्यासाठी उपलब्ध असलेली कर्मचाऱ्यांच्या आवाक्याबाहेरचे असल्याने दुसऱ्या विभागातील ठेकेदारांची मदत घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणल्याचे दिसते. अपिलार्थीचा मीटर कुलूपबंद पेटीमध्ये असल्यामुळे अपिलार्थीचा वीज पुरवठा पर्ववत चालू झाला की नाही, याची शहानिशा करण्यास प्रतिवादींना उशीर झाला. दिनांक ३० ऑगष्ट २०२१ रोजी अपिलार्थीचा वीज पुरवठा पर्ववत करण्यात आला. ३० ऑगष्ट २०२१ ते ६ जानेवारी २०२२ रोजी या कालावधीत मीटरवर वीजेचा वापर झाल्याचे प्रतिवादीने निदर्शनास आणून दिले. ऑगष्ट २०२१ मध्ये पावसामुळे शेतीच्या पंपाचे विशेष काम नसत.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

९.	मंचाने अपिलकर्त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवर साधक-बाधक विचार केलेला असल्याचे दिनांक ७ जुलै २०२२ रोजीच्या आदेशात दिसून येत आहे. मंचाचा आदेश योग्य आहे.

१०.	या सर्व बाबींचा एकत्रित यथासांग विचार करून अपिलार्थीचे अभिवेदन नामंजूर करण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai